नि. फौजदारी खटला क्र. <u>२४४/२०२३</u>
सरकार विरूद्ध निखील व अन्य एक
**निशाणी २७**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ८ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : सरवण चंदुलाल कहार, |
| वय | : ३८ वर्षे, |
| धंदा | : मासे विक्रेता, |
| राहणार | : टाकपुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला. |

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

मी निखील कहार व हर्ष कहार यांना ओळखतो कारण ते माझे दुरचे नातेवाईक आहेत. दोन्ही आरोपी आजरोजी न्यायालयासमक्ष हजर आहेत. मी फिर्यादी काजल हिला ओळखतो. मला घटनेबाबत काहीच माहित नाही. मी बाजारासाठी बाहेरगावी गेलेलो होतो. पोलीसांनी माझे बयान नोंदवले नाही. असे घडले नाही की, आरोपींनी सुभाष गौर याला मारले होते.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे बयान नोंदवले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २९/०७/२०२३ रोजी टाकपुरा, अकोट येथे आरोपी क्र. २ याने सुभाष गौर याच्या डोक्यात लोखंडी रॉड मारला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा भाउ पवन याने सुभाष गौर याला रिक्षातुन दवाखान्यात नेले होते. आता मला माझे बयानातील **अधारेखाकिंत भाग 'अ'** वाचुन दाखवला. सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता. सदर मजकुर माझे बयानात नमुद असण्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे ॲड. श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १५.११.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.